



दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET






Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२७७ ■ शनिवार, दि. ११ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -277 ■ Saturday, 11 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


## उद्धव सेनेला छत्रपती संभाजीनगरात धक्का:मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी केला शिंदे सेनेत प्रवेश

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगरमध्ये ठाकरे गटाला आणखी एक धक्का बसला आहे. ठाकरे गटाचे मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे उद्धव सेना गटाला मोठा धक्का बसला आहे.

आठवडाभरापूर्वी माजी महापौर नंदकुमार घोडले यांनी शिंदे गटात प्रवेश केला असतानाच, आता आणखी एक मोठा नेता शिंदे गटाच्या गळाला लागला आहे. त्यामुळे ठाकरे गटाला आणखी एक धक्का समजला जात आहे. शिवसेनेमध्ये फ्फोडाफ्फोडी मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. त्याचा प्रत्यय पुन्हा एकदा पाहायला मिळाला आहे.

एकीकडे उद्धव सेनेचे नगरसेवक सोडून जाण्याच्या तयारीत असताना उद्धव ठाकरे यांनी नगरसेवकांना भेटून त्यांची पडझड रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र या बैठकांचा परिणाम दिसण्या अगोदर हा प्रवेश करण्यात आला आहे. त्यामुळे शिवसेनेसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे आगामी काळात आणखीन मोठ्या प्रमाणात शिवसेनेचे प्रवेश एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत होणार असल्याचा दावा संजय शिरसाठ यांनी केला आहे

शिवसेनेला कुठलही भवितव्य नाही

शिरसाठ म्हणाले की, उद्धव सेनेत आता कुठल्याही भवितव्य नाही आमचे चाळीस वरून ६० आमदार झाले तर त्यांच्या आमदारांची संख्या वीस वर आली आहे त्यामुळे आता अधिकाऱ्यांना कुठलाही भवितव्य नसल्याची टीका त्यांनी केली. त्यामुळे उद्धव ठाकरे आता केवळ पदाधिकाऱ्यांना भेटी देत आहेत मात्र यापूर्वी त्यांनी कधीही नगरसेवकांना भेट दिल्या जात नव्हत्या.आता पदाधिकारी सोडून जात असल्यामुळे त्यांना यांची आठवण आली असल्याची टीका शिरसाठ यांनी केली.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, माजी महापौर नंदकुमार घोडेले, गजानन बारवाल, विकास जैन, उपशहर प्रमुख सतीश निकम, मोहित त्रिवेदी उपस्थित होते.

## कल्याणमधील सेक्स रॅकेटचा पर्दाफाश! वेश्या व्यवसायातून १३ महिलांची सुटका

कल्याण : कल्याण स्टेशनजवळ होत असलेल्या बेकायदेशीर वेश्या व्यवसायातून १३ महिलांची सुटका करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. महात्मा फ्फुले पोलिसांनी कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात गुरुवारी छापा टाकला आहे. या छाप्यात पोलिसांनी वेश्याव्यवसायात ढकलल्या गेलेल्या १३ म हिलांचीही सुटका केली आहे.तक्रारींच्या आधारे कारवाई करत पोलीस पथकाने कल्याण रेल्वे स्थानकाजवळ छापा टाकला. यावेळी, तीन महिलांसह चार आरोपींना ताब्यात घेण्यात आलं.

पोलिसांच्या माहितीनुसार, परिसरातील एसटी बस स्टॉपच्या मागे उघड्यावर बेकायदेशीरपणे हे काम सुरू होतं. या कारवाईत पोलिसांना बेकायदेशीर रॅकेटचा पर्दाफ्फाश करण्यात यश आलं आहे. घटनास्थळावरून १३ महिलांची सुटका करण्यात आली आणि अधिक सुरक्षिततेसाठी त्यांना उल्हासनगर येथील आश्रयगृहात पाठवण्यात आलं. सुटका केलेल्या महिलांची ओळख गुप्त ठेवण्यात आली असून, त्यांना पुनर्वसनासाठी पाठवण्यात आलं आहे. या महिलांना समुपदेशन आणि सरकारी योजनांद्वारे मदत दिली जाईल.या प्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांची चौकशी सुरू आहे. या रॅकेटमध्ये आणखी कोण कोण सहभागी आहे आणि ते किती काळापासून चालवलं जात होतं याचाही तपास केला जात आहे.

## टोरेस घोटाळा : ३०० रुपयांचे खडे डायमंड म्हणून ५० हजार रुपयांना विकले, आरोपीच्या घरातून ७७ लाख जप्त

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबईतील टोरेस घोटाळ्याचा तपास मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरु करण्यात आला आहे. टोरेसची सर्व कार्यालयं सील करण्यात आली आहेत. तर, टोरेसची तीन बँक खाती देखील गोठवण्यात आली आहेत. या प्रकरणी आणखी माहिती समोर आली आहे. ती म्हणजे टोरेसकडून गुंतवणूकदारांना ३०० रुपयांचे मोइसॅनाइटच्या खड्यांची विक्री करण्यात आली होती. मोइसॅनाइटचा एक खडा भारतीय बाजारात ३०० रुपयांना मिळत असून तो ४२- ५० हजार रुपयांना विकण्यात आला. यासोबत एक प्रमाणपत्र देखील देण्यात येत असे, अशी माहिती समोर आली आहे. त्याशिवाय पोलिसांनी अटकेत असलेल्या आरोपी तानिया कसातोवाच्या घरातून ७७ लाखांची रक्कम जप्त केल्याची माहिती आहे.

मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेचे डीसीपी संग्रामसिंह निशानदार यांनी गुरुवारी सकाळपासून सुरु करण्यात आलेली छापेमारी शुक्रवारी सायंकाळपर्यंत सुरु होती अशी माहिती दिली. पोलिसांनी आरोपी उझबेकिस्तानची नागरिक तानिया कसातोव्हाच्या घरातून ७७ लाख रुपयांची रोकड जप्त केल्याची माहिती आहे. पोलिसांनी आतापर्यंत पाच कोटी रुपये जप्त केले आहेत.

जे लोक मोइसॅनाइटचा खडा डायमंड म्हणून खरेदी करतील त्यांना इन्सेटिव्ह दिला जाईल, म हिन्याभरात १० ते १५ टक्के परतावा मिळेल, असं सांगितलं जायचं. याशिवाय एखाद्या ग्राहकानं इतरांना टोरेसमध्ये पैसे गुंतवण्यासाठी जोडल्यास त्याला देखील प्रोत्साहन भत्ता दिला जाईल, असं आश्वासन दिलं गेलं होतं. या प्रकारे टोरेस घोटाळा सुरु होता.

**टोरेसचा भांडाफोड कसा झाला?**

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार ५ जानेवारीला दादरच्या टोरेसच्या शोरुममध्ये एका बैठकीत कर्मचारी आणि कंपनीच्या व्यवस्थापनात पगारावरुन वाद झाला. त्या बैठकीत कर्मचाऱ्यांनी पगाराबाबत चिंता व्यक्त करत शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांच्या सोबत काही गुंतवणूकदार देखील पोलीस स्टेशनला पोहोचले आणि हे प्रकरण पुढं आलं.

मुंबई पोलिसांनी या प्रकरणी आतापर्यंत ३ आरोपींना अटक केली आहे. उझबेकिस्तानची नागरिक तानिया कसातोव्हा, रशियाची वॅलेंटिना गणेश कुमार, सर्वेश सुर्वे यांना अटक करण्यात आली आहे.

जॉन कार्टर, ओलेना स्टोइन आणि विक्टोरिया फरार आहेत. टोरेसचे अकाऊंटट अभिषेक गुप्ता यांनी डिसेंबर महिन्यात १०० पानांचा एक मेल पोलिसांना केला होता. ज्यामध्ये टोरेस संदर्भातील अनेक गोष्टी पोलिसांना कळवण्यात आल्या होत्या.

दरम्यान, मुंबई, नवी मुंबईतील जवळपास अंदाजे सव्वा लाख गुंतवणूकदारांनी टोरेसमध्ये पैशांची गुंतवणूक केली असून काही जणांनी कर्ज काढून देखील यामध्ये पैसे गुंतवले होते.

## हृदयद्रावक दुर्दैवी घटना

## पतंग पकडण्याच्या नादात विजेचा तारच पकडला



पतंग उडवण्यात इतके ही दंग होने काही कामाचे नाही. नाहक एका बालकाला आपला जीव गमवावा लागला. पतंगाची डोर पकडता पडकता जीवनाची दोरच कापली गेली. सोशल मिडियावर या छायाचित्राचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ कुठला आहे हे ठोसपण सांगणे अवघड होत आहे. तरी ही घटना कुठली आहे या पेक्षा अशी घटना कुठेच घडू नये यासाठी होईल तितकी जनजागृती आवश्यक आहे. पतंग नाही उडवले तर काही फरक पडत नाही परंतु निष्पाप बळी जाता कामा नये. मांजामुळे अनेकांचे गळे कापले गेले तसेच इतरही शारीरिक इजा होत आहे.कृपया सावधनता बाळगूनच कार्य करावे.

**पालकांनो जरा लक्ष द्या-** पालकांनी कृपया आपल्या मुलांवर लक्ष द्या. पतंग हजारो येतील पण जीव जर का एकदा गेला तर परत कधीच येत नाही.

## ठाकरे गट फडणवीसांच्या प्रेमात; पवार महविकास आघाडीतून बाहेर पडणार - संजय शिरसाट यांचा दावा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा महाविकास आघाडीतील घटकपक्षांवर निशाणा साधला आहे. शिवसेनेचा ठाकरे गट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेमात पडला आहे. तर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची महाविकास आघाडीत राहण्याची अजिबात इच्छा नाही. त्यामुळे शरद पवारांचा पक्ष येत्या महिन्याभरात नेमका कुठे उभा आहे हे स्पष्ट होईल, असे ते म्हणालेत.

संजय शिरसाट येथे पत्रकारांशी बोलताना म्हणाले, राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची महाविकास आघाडीत राहण्याची इच्छा नाही. त्यामुळे त्यांचा पक्ष नेमका कुठे उभा आहे हे महिन्याभरात दिसून येईल. कारण, राष्ट्रवादीला पक्ष बदलण्याची सवय आहे. महिनाभरात त्यांचा वेगळा अजेंडा दिसेल. यासंबंधी दोन्ही पवार एकत्र येण्याचेही संकेत आहेत.

दुसरीकडे, ठाकरे गटही देवेंद्र फ्फडणवीस यांच्या प्रेमात पडला आहे. त्यांच्या प्रेमातून शरद पवार गट थकला आहे. त्यामुळे आज ठाकरे गटाला प्रवाहाच्या बाहेर राहणे परवडणारे नाही. त्यांनी वेळीच निर्णय घेतला नाही तर त्यांच्यावर माशीसारखी तडफफडण्याची वेळ येईल. सध्या त्यांच्यापुढे समुद्रात उडी मारण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही, असेही ते म्हणाले.

## विद्यार्थ्यांनो लक्ष द्या! १२ वी परीक्षेचं हॉल तिकीट ऑनलाईन उपलब्ध

**मुंबई :** फेब्रुवारी-मार्च दरम्यान होणाऱ्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची अत्यंत महत्वाच्या १२ वी परीक्षेचं हॉल तिकीट ऑनलाईन उपलब्ध झालं आहे. हे हॉल तिकीट कनिष्ठ महाविद्यालयांना ऑनलाइन पद्धतीने शुक्रवारपासून (दि १०) उपलब्ध करून दिले आहे. विद्यार्थ्यांनी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून हॉल तिकीट पाहावे. यासंदर्भात विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचण आल्यास उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा, असे आवाहन मंडळाने केले आहे. उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी बारावी परीक्षेची ऑनलाइन हॉल तिकीट प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यायचे आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क महाविद्यालय व उच्च माध्यमिक शाळा आकारू शकत नाही. हॉल तिकिटाच्या प्रिंटवर मुख्याध्यापक, प्राचार्य यांनी स्वाक्षरी असणे गरजेचे आहे.

## आम्ही प्रत्येक 'वारां'चा सन्मान करतो, कारण आम्ही हेडगेवारांचे अनुयायी आहोत - मुख्यमंत्री

**चंद्रपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

तुलनेने अतिशय मागास असलेल्या कष्टकरी समाजात दादासाहेब कन्नमवार यांनी जन्म घेतला, मात्र स्वत:च्या मेहनतीवर त्यांनी आपले कर्तृत्व सिध्द केले. दादासाहेब हे ध्येयवादी नेते होते. राज्याचा आणि जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास घेऊन ते संपूर्ण जीवन जगले. अशा नेत्यांचे विचार आणि कार्य पुढच्या पिढीपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे, असे मनोगत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृह येथे बेलार समाज संघटना व रौप्य महोत्सव समितीच्या वतीने आयोजित कर्मवीर मा. सा. कन्नमवार शतकोत्तर रौप्य महोत्सवी सोहळ्यात मुख्यमंत्री फ्फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार विजय वडेट्टीवार तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार सर्वश्री किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे, सुधाकर अडबाले, माजी मंत्री शोभाताई फ्फडणवीस, प्रभारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, आयोजन समितीचे राहुल कन्नमवार, सुर्यकांत खनके आदी उपस्थित होते.



राज्याचे दुसरे मुख्यमंत्री आणि चंद्रपूर जिल्ह्याचे सुपुत्र मा. सा. कन्नमवार यांची आज १२५ वी जयंती आहे. यानिमित्त राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत चंद्रपूरमध्ये एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चंद्रपूरचे भाजपा आमदार किशोर जोरगेवारहे कार्यक्रमाचे मुख्य आयोजक आणि स्वागताध्यक्ष होते. माजी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांना कार्यक्रमाचे अध्यक्षपद देण्यात आले. यामुळे भाजपा नेते सुधीर मुनगंटीवारनाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. यावरून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फ्फडणवीस यांनी महत्त्वाचे वक्तव्य केले.

कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फ्फडणवीस म्हणाले की, दादासाहेब यांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला, अशा नेत्याचा समाजाला विसर पडू नये म्हणून मी या कार्यक्रमाला आलोय. हा वाघ आणि वारांचा जिल्हा आहे. मुनगंटीवार आमचे नेते आहेत. आम्ही प्रत्येक 'वारां'चा सन्मान करतो, कारण आम्ही हेडगेवारांचे अनुयायी आहोत, असे त्यांनी म्हटले आहे.

**कर्मवीर दादासाहेबांचे विचार आणि कार्य पुढच्या पिढीपर्यंत पोहचवा**

लोकनेते दादासाहेब कन्नमवारांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आज येथे उपस्थित राहता आले, याचा अतिशय आनंद आहे, असे सांगून मुख्यमंत्री फ्फडणवीस म्हणाले, दादासाहेब यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला होता. महात्मा गांधी आणि लोकमान्य टिळकांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता.

भारत - चीन युध्दाच्या वेळी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांना देशाच्या संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून मा.सा. कन्नमवार यांनी राज्याची सुत्रे सांभाळली. या पदावर ते १ वर्ष ४ महिने होते. युध्दाचा तो काळ होता. अशा परिस्थितीत आर्थिक सहाय्य करण्यासाठी दादासाहेबांनी जनतेला आवाहन केले. त्याकाळात चंद्रपूर जिल्ह्याने तसेच महाराष्ट्राने त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत देशासाठी सोने-नाणे, आर्थिक मदत दान केली.

शिक्षण आणि आरोग्य हे अतिशय महत्वाचे विषय आहेत. प्रत्येक गावात आरोग्य केंद्र असावे, असा सर्वप्रथम विचार कर्मवीर दादासाहेबांनी मांडला. तसेच शिक्षणाच्या क्षेत्रातही त्यांनी अनेकांना प्रेरीत केले.

या राज्याच्या प्रगतीसाठी अतिशय मोठे योगदान दादासाहेबांनी दिले आहे. विधानसभेच्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांचा गौरवग्रंथ प्रकाशित करण्यात येईल. पुढे मुख्यमंत्री फ्फडणवीस म्हणाले, सामान्य माणसांचा विकास करणे, हेच आपल्या सरकारचे सुध्दा ध्येय आहे. जिल्ह्याचा विकास करण्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन काम करावे. त्यामुळे जिल्ह्याच्या संदर्भात सर्व अडचणी सोडविण्यात येईल. तसेच ज्या मागण्या करण्यात आल्या आहेत, त्यासुध्दा पूर्ण केल्या जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

# हिमालयातील नवे संकट

हवामान खात्याच्या अंदाजानुसार ईशान्येचा भाग वगळता उर्वरित हिमालयीन प्रदेशात या वर्षी सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे आणि पाऊस कमी झाला तर बर्फ कमी पडेल. त्याचा हिमालयाशी संबंधित पाच देशांवर व्यापक प्रभाव पडतो. कारण हिमालय हा आशियाचा जलस्तंभ असण्याबरोबरच या खंडाचा हवामान नियंत्रकदेखील आहे. भारतीय हवामान विभागाच्या मते उत्तर आणि उत्तर-पश्चिम भारताच्या बहुतेक भागात आणि पूर्व आणि ईशान्य भारताच्या काही भागात सामान्यपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. येत्या काळात दक्षिण भारतातील द्वीपकल्पीय भागात सामान्यपेक्षा १२१ टक्के जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. अंदाजानुसार, दक्षिण पॅसिफिक महासागरात तटस्थ 'अल निनो' परिस्थिती आहे, तर 'ला निना' परिस्थिती आणखी विकसित होऊ शकते. त्यामुळे भारतीय हवामानावर परिणाम होऊ शकतो. हिमालयातील बर्फवृष्टीवर कमी पावसाचा थेट परिणाम होतो. कारण हिमवर्षाव पावसाच्या स्वरूपात होतो; पण ते तापमान आणि उंचीवर अवलंबून असते. कमी पावसामुळे, हिमालयातील उंच शिखरे आणि खोऱ्यांना बर्फाऐवजी हलका पाऊस किंवा कोरड्या हवामानाचा सामना करावा लागू शकतो. तज्ज्ञांच्या मते, हिमालयात कमी पाऊस आणि कमी बर्फवृष्टीची मुख्य कारणे म्हणजे जागतिक हवामानबदल, 'अल निनो'चा प्रभाव, वातावरणातील दाब आणि मानवी क्रियाकलापांतील बदल. वातावरणातील दाबाच्या नमुन्यातील बदलांमुळे उत्तर-पश्चिमी वारे हिमालयाच्या वरच्या भागात पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे पाऊस आणि बर्फवृष्टी कमी होऊ शकते.

जागतिक हवामानबदलामुळे तापमान वाढत आहे. त्याचा परिणाम बर्फवृष्टीच्या प्रक्रियेवर होतो. उष्णता वाढली की बर्फाऐवजी पाऊस अधिक पडू लागतो. याव्यतिरिक्त, पृथ्वीच्या हवामानचक्रात नैसर्गिक बदल आहेत, जसे की आंतरमान्सून आणि मान्सून ब्रेक्स. त्यामुळे हिमालयाच्या प्रदेशात कमी पाऊस आणि बर्फवृष्टी होऊ शकते. कमी हिमवर्षाव म्हणजे बर्फ वितळणे. त्याचा थेट परिणाम नद्यांच्या जलपातळीवर होतो. यामुळे पाण्याचे संकट उद्भवू शकते. त्याचा परिणाम शेती, पिण्याचे पाणी आणि उद्योगांवर होतो. गंगा, यमुना, सतलज, सिंधू आणि ब्रह्मपुत्रा या ग्लेशियरवर आधारित नद्या भारतीय उपखंडासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण या नद्या केवळ पाणीपुरवठ्याचे प्रमुख स्रोत नसून शेती, उद्योग, वीजनिर्मिती आणि पिण्याच्या पाण्यामध्येही मोठी भूमिका बजावतात. या नद्यांवर मोठे जलविद्युत प्रकल्प सुरू आहेत आणि आणखी अनेक बांधकामे सुरू आहेत. त्यांना कमी बर्फवृष्टीचा फटका बसेल. हिमवर्षाव कमी झाल्यामुळे हिमनद्या झपाट्याने वितळू लागतात. परिणामी, हिमालयीन प्रदेशातील पाण्याची पातळी वाढू शकते. त्यामुळे नंतर बर्फाचे वादळ, पूर आणि भूस्खलन यासारख्या आपत्ती उद्भवू शकतात. कमी बर्फवृष्टीमुळे, तापमान वाढल्यामुळे पर्यावरणीय प्रणाली असंतुलित होते. हिमवर्षावाचे एक नैसर्गिक कार्य म्हणजे सूर्याची किरणे (अल्बेडो इफेक्ट) परावर्तित करणे. बर्फ कमी असतो, तेव्हा जास्त उष्णता शोषली जाते. त्यामुळे जागतिक तापमान वाढते. हिमालयात कमी बर्फवृष्टीमुळे भारतीय मान्सून आणि पावसाच्या पद्धतींवरही परिणाम होऊ शकतो. वाढत्या उष्णतेमुळे मान्सूनची दिशा आणि स्वरूप बदलू शकते. त्यामुळे असामान्य पाऊस आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. हिमालयातील बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे पाणीपुरवठ्यात घट होऊ शकते. रब्बी आणि खरीप पिकांवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. हिमालयीन प्रदेशात स्किइंग, ट्रेकिंग आणि बर्फावर आधारित इतर पर्यटन उपक्रम खूप प्रसिद्ध आहेत. बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे या क्रियाकलापांचे आकर्षण कमी होऊ शकते. त्याचा पर्यटन उद्योगावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. याचा परिणाम स्थानिक रोजगार आणि आर्थिक क्रियाकलापांवर होऊ शकतो. या स्थितीत हिमालयातील हवेचा दाब आणि वायुगतीकीमध्ये बदल होऊ शकतो. यामुळे वायु प्रदूषणाची पातळी वाढून श्वसनाचे आजार आणि आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

हिमालयात कमी बर्फवृष्टीमुळे उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होऊ शकतात. अतिउष्णतेमुळे उष्माघात, निर्जलीकरण आणि इतर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत सरकार आणि सामान्य जनतेने कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी अगोदरच तयार राहणे आवश्यक आहे. खास रचनेसाठी ओळखल्या जाणाऱ्या ओम पर्वतावरील बर्फापासून बनवलेला ओमचा आकार काढून टाकण्यात आला आहे. तज्ज्ञांच्या मते तो काढणे हे जागतिक आणि स्थानिक पर्यावरणीय संकटाचे प्रतिबिंब आहे. ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात हा बर्फ गायब झाला. शास्त्रज्ञांच्या मते ओम पर्वत भारत, चीन आणि नेपाळच्या सीमेवर स्थित आहे आणि समुद्रसपाटीपासून सुमारे ५९०० मीटर उंचीवर आहे. हा पर्वत कैलास मानसरोवर यात्रेतही महत्त्वाचा थांबा आहे. चीनच्या सीमेला लागून असलेल्या लिपुलेखपर्यंतचा रस्ता तयार झाल्यानंतर येथील पर्यटकांची संख्याही वाढली आहे.

# पृथ्वी एक दिवस लहान होईल ?

**पृथ्वी परिभ्रमण दिन दरवर्षी ८ जानेवारी रोजी साजरा केला जातो. हा दिवस पृथ्वीच्या स्वत:च्या अक्षाभोवती परिभ्रमणाच्या वैज्ञानिक महत्त्वाची जाणीव करून देतो. पृथ्वी स्वत:भोवती २४ तासांत एक प्रदक्षिणा पूर्ण करते, ज्यामुळे आपल्याला दिवस आणि रात्र अनुभवता येतात. पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे सजीवांना अनुकूल हवामान, सूर्यप्रकाश, आणि तापमानाचा समतोल मिळतो. यामुळेच पृथ्वीवर जीवन अस्तित्वात आहे. पृथ्वीच्या या प्रक्रियेचा अभ्यास वैज्ञानिक आणि खगोलशास्त्रज्ञांसाठी महत्त्वाचा आहे, कारण यामुळे हवामान, वेळ, आणि पृथ्वीच्या हालचालींवर होणारा परिणाम समजण्यास मदत होते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर माहितीपूर्ण लेख वाचा... संपादक.**

### (८-१४ जानेवारी: पृथ्वी परिभ्रमण दिन सप्ताह विशेष.)

पृथ्वीचा परिभ्रमण दिवस ८ जानेवारी रोजी साजरा केला जातो. हा दिवस हा शोध दर्शवितो की आपला ग्रह दर २४ तासांनी त्याच्या अक्षावर फिरतो. पृथ्वीचा परिभ्रमण दिवस- दरवर्षी ८ जानेवारी हा पृथ्वी परिभ्रमण दिवस म्हणून ओळखला जातो. पृथ्वीचे परिभ्रमण किंवा पृथ्वीचे फिरणे म्हणजे पृथ्वीच्या स्वतःच्या अक्षाभोवती ग्रहाचे फिरणे, तसेच अवकाशातील परिभ्रमण अक्षाच्या अभिमुखतेतील बदल होय. पृथ्वी पूर्वेकडे, प्रोग्रेड मोशनमध्ये फिरते. उत्तर ध्रुवीय तारा पोलारिसवरून पाहिल्याप्रमाणे, पृथ्वी घड्याळाच्या उलट दिशेने वळते. डीप स्पेस क्लायमेट ऑब्झर्व्हेटरीद्वारे चित्रित केलेले पृथ्वीचे परिभ्रमण, झुकाव दर्शवित आहे, उत्तर ध्रुव, ज्याला भौगोलिक उत्तर ध्रुव किंवा स्थलीय उत्तर ध्रुव असेही म्हटले जाते, हा उत्तर गोलार्धातील एक बिंदू आहे जिथे पृथ्वीचा परिभ्रमण अक्ष त्याच्या पृष्ठभागाला भेटतो. हा बिंदू पृथ्वीच्या उत्तर चुंबकीय ध्रुवापासून वेगळा आहे. दक्षिण ध्रुव हा दुसरा बिंदू आहे जिथे पृथ्वीचा परिभ्रमण अक्ष त्याच्या पृष्ठभागाला छेदतो, अंटार्क्टिकामध्ये.

पृथ्वी सूर्याच्या संदर्भात २४ तासांतून एकदा फिरते, परंतु इतर दूरच्या ताऱ्यांच्या संदर्भात दर २३ तास ५६ मिनिटे आणि ४ सेकंदांनी एकदा फिरतात. पृथ्वीचे फिरणे कालांतराने थोडे कमी होत आहे, अशा प्रकारे, पृथ्वी एक दिवस लहान होईल. हे पृथ्वीच्या परिभ्रमणावर चंद्राच्या भरतीच्या प्रभावामुळे होते. अणु घड्याळे हे दर्शविते की आधुनिक दिवस एका शतकापूर्वीच्या तुलनेत सुमारे १.७ मिलीसेकंदांनी मोठा आहे, हळूहळू यूटीसी लीप सेकंदांद्वारे समायोजित केला जातो. ऐतिहासिक खगोलशास्त्रीय नोंदींचे विश्लेषण मंद गती दर्शवते; ८व्या शतकापासून एका दिवसाची लांबी प्रति शतक सुमारे २.३ मिलीसेकंदने वाढली आहे. शास्त्रज्ञांनी नोंदवले की सन २०२०मध्ये पृथ्वी वेगाने फिरू लागली होती, पूर्वीच्या दशकांमध्ये दररोज ८६,४०० सेकंदांपेक्षा कमी गतीने फिरत होती. दि.२९ जून २०२२ रोजी पृथ्वीची फिरकी २४ तासांत १.५९ मिलीसेकंदात पूर्ण झाली आणि एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. त्या प्रवृत्तीमुळे जगभरातील अभियंते निगेटिव्ह लीप सेकंड आणि इतर संभाव्य टाइम कीपिंग उपायांवर चर्चा करत आहेत. वेगातील ही वाढ त्याच्या वितळलेल्या गाभा, महासागर आणि वातावरणाची गुंतागुंतीची गती, चंद्रासारख्या खगोलीय पिंडांचा प्रभाव आणि पृथ्वीच्या ध्रुवांवर बर्फ निर्माण करणाऱ्या हवामानातील बदल यासह विविध कारणांमुळे झाल्याचे मानले जाते. वितळणे विषुववृत्ताभोवती उभ्या असलेल्या ओबलेट गोलाकार आकाराचा पृथ्वीचा आकार बर्फाचा वस्तुमान आहे. जेव्हा हे वस्तुमान कमी केले जाते, तेव्हा ध्रुव वजन कमी झाल्यामुळे परत फिरतात आणि पृथ्वी अधिक गोलाकार बनते, ज्यामुळे वस्तुमान त्याच्या गुरुत्वाकर्षणाच्या केंद्राच्या जवळ आणण्याचा परिणाम होतो. कोनीय संवेगाचे संरक्षण हे ठरवते की त्याच्या गुरुत्वाकर्षणाच्या केंद्राभोवती अधिक जवळ वितरीत केलेले वस्तुमान अधिक वेगाने फिरते.

इतिहास: नेपाळी हिमालयाच्या वरच्या रात्रीच्या उत्तरेकडील आकाशाचा हा दीर्घ-प्रदर्शनी फोटो पृथ्वी फिरत असताना ताऱ्यांचे स्पष्ट मार्ग दाखवतो. प्राचीन ग्रीक लोकांमध्ये, पायथागोरियन शाळांपैकी अनेकांचा विश्वास होता की आकाशाच्या दैनंदिन रोटेशनपेक्षा पृथ्वीच्या फिरण्यावर विश्वास होता. कदाचित पहिला फिलोलस- ४७०-३८५ बीसीई होता, जरी त्याची प्रणाली क्लिष्ट होती, ज्यामध्ये मध्यवर्ती आगीबद्दल प्रति-पृथ्वी फिरत होती. तथापि, ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात ॲरिस्टॉटलने फिलॉलॉसच्या कल्पना निरीक्षणाऐवजी सिद्धांतावर आधारित असल्याची टीका केली. त्याने पृथ्वीभोवती फिरणाऱ्या स्थिर ताऱ्यांच्या गोलाची कल्पना मांडली. नंतर आलेल्या बहुतेकांनी हे मान्य केले, विशेषत: क्लॉडियस टॉलेमी- २रे शतक, ज्यांना वाटले की पृथ्वी फिरली तर वादळी वाऱ्यांमुळे त्याचा नाश होईल. ४९९ सीई मध्ये, भारतीय खगोलशास्त्रज्ञ आर्यभट्ट यांनी असे सुचवले की गोलाकार पृथ्वी आपल्या अक्षाभोवती दररोज फिरते आणि ताऱ्यांची स्पष्ट हालचाल ही पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे होणारी सापेक्ष गती आहे. त्यांनी पुढील उपमा दिली, 'ज्याप्रमाणे एका दिशेला जाणाऱ्या बोटीतील माणसाला काठावरील स्थिर वस्तू विरुद्ध दिशेने जाताना दिसतात, त्याचप्रमाणे लंकेतील माणसाला स्थिर तारे पश्चिमेकडे जाताना दिसतात.'



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा- ७७७५०४१०८६.

१०व्या शतकात, काही मुस्लिम खगोलशास्त्रज्ञांनी स्वीकारले की पृथ्वी आपल्या अक्षाभोवती फिरते. अल-बिरुनीच्या मते, अल-सिज्जी (डीसी-१०२०) यांनी त्याच्या काही समकालीनांच्या विश्वासावर आधारित अल-झुराकी नावाच्या ज्योतिषशास्त्राचा शोध लावला 'आम्ही पाहत असलेली गती पृथ्वीच्या हालचालीमुळे आहे, पृथ्वीच्या आसाच्या हालचालीमुळे नाही.' या मताच्या प्रचलिततेला १३व्या शतकातील एका संदर्भाद्वारे पुष्टी दिली जाते ज्यामध्ये असे म्हटले आहे, 'भूमापक किंवा अभियंते, मुहांडिसिननुसार, पृथ्वी सतत वर्तुळाकार गतीमध्ये आहे आणि काय दिसते? आकाशाची हालचाल पृथ्वीच्या गतीमुळे होते, ताऱ्यांच्या गतीने नाही.' त्याच्या संभाव्यतेवर चर्चा करण्यासाठी, एकतर खंडन म्हणून किंवा टॉलेमीच्या त्याविरुद्धच्या युक्तिवादांबद्दल शंका व्यक्त करण्यासाठी ग्रंथ लिहिले गेले. मराघा आणि समरकंद वेधशाळांमध्ये तुसी (जन्म १२०१) आणि कुशजी (जन्म १४०३) यांनी पृथ्वीच्या परिभ्रमणाची चर्चा केली; त्यांनी वापरलेले युक्तिवाद आणि पुरावे कोपर्निकसने वापरलेल्या पुराव्यांसारखे आहेत. मध्ययुगीन युरोपमध्ये, थॉमस ॲक्विनासने ॲरिस्टॉटलचे मत स्वीकारले आणि म्हणूनच, चौदाव्या शतकात जॉन बुरिदान आणि निकोल ओरेस्मे यांनी अनिच्छेने स्वीकारले. सन १५४३मध्ये निकोलस कोपर्निकसने सूर्यकेंद्री जागतिक प्रणाली स्वीकारल्याशिवाय पृथ्वीच्या परिभ्रमणाची समकालीन समज प्रस्थापित होऊ लागली नाही. कोपर्निकसने निदर्शनास आणून दिले की जर पृथ्वीची हालचाल हिंसक असेल, तर ताऱ्यांची हालचाल त्याहून अधिक असली पाहिजे. त्यांनी पायथागोरियन्सचे योगदान मान्य केले आणि सापेक्ष गतीच्या उदाहरणांकडे लक्ष वेधले. कोपर्निकससाठी, मध्य सूर्याभोवती प्रदक्षिणा घालणाऱ्या ग्रहांचा सोपा नमुना स्थापित करण्याची ही पहिली पायरी होती.

टायको ब्राहे, ज्याने अचूक निरीक्षणे तयार केली ज्यावर केप्लरने ग्रहांच्या गतीचे नियम आधारित केले, कोपर्निकसच्या कार्याचा उपयोग स्थिर पृथ्वी गृहीत धरणाऱ्या प्रणालीचा आधार म्हणून केला. सन १६००मध्ये, विल्यम गिल्बर्टने पृथ्वीच्या चुंबकत्वावरील त्याच्या ग्रंथात पृथ्वीच्या परिभ्रमणाचे जोरदार समर्थन केले आणि त्यामुळे त्याच्या अनेक समकालीनांवर प्रभाव पडला. २०८गिल्बर्ट सारख्या ज्यांनी सूर्याविषयी पृथ्वीच्या हालचालीचे उघडपणे समर्थन केले नाही किंवा नाकारले नाही, त्यांना अर्ध-कोपर्निकन्स म्हणतात. २२१ कोपर्निकसच्या एका शतकानंतर, रिकिओलीने घसरणाऱ्या शरीरात तत्कालीन-निरीक्षण करण्यायोग्य पूर्वेकडे विक्षेपण नसल्यामुळे फिरणाऱ्या पृथ्वीच्या मॉडेलवर विवाद केला; अशा विक्षेपणांना नंतर कोरिओलिस इफ्फेक्ट म्हटले जाईल. तथापि, केप्लर, गॅलिलिओ आणि न्यूटन यांच्या योगदानाने पृथ्वीच्या परिभ्रमणाच्या सिद्धांताला पाठिंबा मिळवून दिला. पृथ्वी परिभ्रमण दिन आपल्याला निसर्गाच्या या अद्भुत चक्राबद्दल विचार करण्यास प्रवृत्त करतो. हा दिवस आपल्याला पृथ्वीच्या पर्यावरणाचे रक्षण करण्याचे आणि निसर्गाशी सुसंगत जीवन जगण्याचे महत्त्व सांगतो. पृथ्वीवरील संतुलन जपण्यासाठी मानवाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

!! पृथ्वी परिभ्रमण दिनाच्या सर्वांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# पत्रकार नेताजी जाधव यांना व्हॉइस ऑफ मिडिया यांच्याकडून डिजिटल मिडिया युवा पुरस्कार प्रदान..




**लातूर/अमरजीत बनसोडे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दिनांक ६ जानेवारी आद्य मराठी पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनानिमित्त आज दिनांक ६ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता भालचंद्र ब्लड बँक सभागृह येथे व्हॉइस ऑफ मिडिया या पत्रकार संघटनेच्या वतीने आयोजित डिजिटल मीडियात उत्कृष्ट काम करणाऱ्या युवा पत्रकारांना युवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी लातूर नेता न्यूज चैनल मुख्य संपादक नेताजी जाधव यांचा डिजिटल क्षेत्रातील न्यूज ची दखल घेत युवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे

हा सन्मान जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेचे जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार, डिजिटल विभागाचे जिल्हाध्यक्ष सितम सोनवणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. यावेळी व्हाईस ऑफ मिडियाचे शहाजी पवार, अभय मिरजकर, राघवेंद्र देबटवार, सचिन चांडक, योगीराज पिसाळ, अनिल पुरी, हमीद शेख, विनोद चव्हाण, शिरीष कुमार शेरखाने, मधुकर चलमाले, खंडेराव देडे, राम रोडगे, प्रभाकर शिरुरे, अशोक कुलकर्णी, दिलीप मुनाळे, सुभाष सगर, आनंद माने, गजानन ढगे, काकासाहेब घुटे, संतोष खंडेलवाल, अमरजीत, माऊली परांडे, संतोष सोनवणे, प्रकाश कंकाळ, साईनाथ घोणे, धनराज वाघमारे आदी दैनिक वृत्तपत्र साप्ताहिक व डिजिटल मिडिया प्रमुख व संपादक उपस्थित होते..

# नैसर्गिक आपत्तीग्रस्त ५.३० लाख शेतकऱ्यांना ५३५ कोटी रुपयांची पीक नुकसान भरपाई - मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. याअंतर्गत ५ लाख ३० हजार ४५ शेतकऱ्यांना ५३५ कोटी ६५ लाख ७४ हजार ८९३ रुपयांची मदत वितरित करण्यात आली आहे. मदतीची ही रक्कम थेट आपदग्रस्त लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यास शासन नेहमीच प्राधान्य देत असून विविध नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेती पीक नुकसानीपोटी मार्च २०२३ पासून ९ हजार ३०७ कोटी रुपये (नऊ हजार तीनशे सात कोटी रुपये) इतकी रक्कम डीबीटीद्वारे शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यांमध्ये थेट जमा करण्यात आली आहे.

विभागाने शेतकऱ्यांचे ई-केवायसी त्वरित पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम राबवली, ज्यामुळे प्रलंबित प्रकरणांची पडताळणी जलद गतीने पूर्ण करण्यात आली. या धोरणात्मक उपक्रमामुळे बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मदत वितरण करणे शक्य झाले असल्याचे मंत्री श्री. जाधव - पाटील यांनी सांगितले.

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांप्रती राज्य शासन संवेदनशील असून ही भरपाई शासनाच्या आपत्कालीन प्रतिसादाची प्रतिबद्धता दर्शवते, अशी भावना मंत्री श्री. जाधव - पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांप्रती राज्य शासन संवेदनशील आहे. या शेतकऱ्यांना नुकसानीची भरपाईची रक्कम तातडीने मिळावी यासाठी मदत व पुनर्वसन विभाग दक्ष आहे. राज्य शासनाने विविध नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी ५ लाख ३० हजार शेतकऱ्यांना ५३५ कोटी रुपयांची भरपाई वितरित केली आहे. ही रक्कम संबधित शेतकऱ्यांच्या आधार संलग्न खात्यावर जमा करण्यात येत आहे, असे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी सांगितले.

पान ३ वर

# आयोध्येतील प्रभूश्रीराम यांच्या प्रतिष्ठापनेच्या प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने आज राष्ट्र जागरण समरसता महायज्ञ

छत्रपती संभाजीनगर, दि. १० (प्रतिनिधी) - अयोध्येतील राममंदिर हे केवळ मंदिर नसून ते राष्ट्रमंदिर आहे. मागील वर्षी २२ जानेवारी २०२४ रोजी पूजनीय संत महंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहनजी भागवत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व देशभरातील मान्यवरांच्या उपस्थितीत बालरुपातील प्रभू श्रीराम अयोध्येतील भव्य मंदिरात विराजमान झाले. या घटनेला या राष्ट्र मंदिराच्या निर्माणाला तिथीनुसार शनिवार दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. या निमित्ताने देशभर मंदिर केंद्र ठेवून प्रथम वर्धापन दिन साजरा होणार आहे या निमित्ताने संभाजीनगर शहरात हिंदू समाजाच्या विविध घटकातील २१ जोडप्यांच्या हस्ते गारखेडा परिसरातील हेडगेवार रुग्णालयाच्या मागे बँक ऑफ इंडिया जवळ असलेल्या हनुमान मंदिरा समोरील श्रीराम उद्यानात शनिवार दिनांक ११ जानेवारीला सायंकाळी ५ वाजता विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय मंत्री श्री वसंतकुमार रथ,पूज्य स्वामी

आत्मेशानंद महाराज, श्रीमती मंगलाताई चव्हाण, श्री.संजय आप्पा बारगजे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच आचार्य मुकेशकुमार पाठक, आचार्य धीरज मिश्रा, आचार्य राजेश शर्मा, वेदमूर्ती गौरव गर्ग, पंडित अजय शास्त्री व केशव माधव चतुर्वेद पाठशाळेचे सर्व ब्रह्मचारी आणि महर्षी पाणीनि कन्या वेद पाठशालेच्या सर्व ब्रह्मचारिणीच्या उपस्थितीत समरसता यज्ञ व गोपूजन संपन्न होणार आहे.

या समरसता यज्ञासाठी सर्व हिंदू बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येत उपस्थित राहावे असे आवाहन मंदिर आर्चक पुरोहित आयामाचे श्री राजीव जहागीरदार राजू पाथरीकर विश्व हिंदू परिषद शहराध्यक्ष डॉक्टर सुशील भारुका शहर मंत्री अभिषेक कादी यांनी केले आहे, असे मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयाम विश्व हिंदू परिषद संभाजीनगर देवगिरी प्रांत यांनी सांगितले.

श्री.रामललाच्या मूर्ती प्रतिष्ठापनेच्या व मंदिर लोकार्पणाच्या प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने राष्ट्र जागरणासाठी समरसता महायज्ञ. २२ जानेवारी २०२४ रोजी ४९६ वर्षाच्या संघर्षानंतर आयोध्येत प्रभूश्रीराम भव्य अशा मंदिरामध्ये विराजमान झाले या घटनेला तिथीनुसार शनिवार दिनांक ११ जानेवारीला एक वर्ष पूर्ण होत आहे.

यानिमित्ताने हिंदू समाजातील विविध जातीपंथातील २१ जोडप्यांच्या हस्ते मान्यवर आचार्य आणि पुरोहित यांच्या नेतृत्वात समरसता महायज्ञाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमात प्रमुख वक्ते- मा.श्री.वसंतकुमार रथ, केंद्रीय मंत्री व अखिल भारतीय सत्संग प्रमुख विश्व हिंदू परिषद, आशिर्वचन- पूज्य स्वामी आत्मेशानंद महाराज. चिन्मय मिशन संभाजीनगर, प्रमुख अतिथी- मा.श्रीमती मंगलाताई चव्हाण अध्यक्ष-महाबली हनुमान मंदिर ट्रस्ट, प्रमुख उपस्थिती- मा.श्री. संजयआप्पा बारगजे, अध्यक्ष- विश्व हिंदू परिषद,देवगिरी प्रांत, यांची उपस्थिती राहणार आहेत.

या समरसता यज्ञास सर्वांनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे ही विनंती. शनिवार दि.११ जाने. २०२५, वेळ : सायंकाळी ५ वाजता, स्थान : श्रीराम उद्यान हनुमान मंदिरासमोर बँक ऑफ इंडिया जवळ गारखेडा परिसर संभाजीनगर.

# त्यागपूर्वक भोग: शब्दांशी अडले दासगणू !!!

### (संत दासगणू महाराज जयंती उत्सव सप्ताह विशेष)



**महत कल्याणकारी व जगाला वरदायी झालेल्या दासगणू महाराजांचे जीवन आपल्या सामान्य लोकांसाठी अमृत आहे. श्री साईबाबांचे कथामृत एकही कथा त्यांचे चरित्र सांगितल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. साईबाबांचे जीवनचरीत्र देशविदेशात पोहचविण्यासाठी त्यांचे अतुलनीय योगदान आहे. त्यांचे ग्रंथकार्य साई चरित्र, श्री गजाननविजय व इतर विस्तृत वायय पाहता दासगणू महाराजांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, हे प्रत्येक साईभक्ताचे कर्तव्यच ठरते. असा हा बापू- श्रीकृष्णदास निरंकारीजींचा माहितीपूर्ण व ज्ञानवर्धक लेख... संपादक.**

दासगणू महाराज हे श्री साईबाबा यांचे परमभक्त होते. साईबाबांच्या स्फ्रूर्तीनेच त्यांनी ओवीबद्ध रचना करण्यास सुरुवात केली. त्यांच्या अभंगस्वरूप लेखनात साईबाबांचा उल्लेख सतत येतो. गणू म्हणे ही त्यांची नाममुद्रा होती. ते साईबाबांनाचा ब्रह्मा-विष्णू-महेशांच्या रूपात पाहत. दासगणू महाराज हेच साईबाबा संस्थानचे पहिले अध्यक्ष होते. त्यांच्या प्रमुख रचना व ग्रंथसंपदा अशा आहेत.

१) श्री आऊबाई चरित्र २) ईशावास्य भावार्थ बोधिनी ३) श्री गजानन विजय: या ग्रंथामधे श्री.गजानन महाराजांचे चरित्र त्यांनी लिहून ठेवले आहे. हे ग्रंथही महाराष्ट्रात खूप लोकप्रिय आहेत. ४) भक्त लीलामृत ५) भक्तिसारामृत ६) भाव दीपिका ७) शंकराचार्य चरित्र ८) संत कथामृत ९) श्री साईनाथ स्तवनमंजिरी १०) शिर्डी माझे पंढरपुर- साईबाबांची आरती. इतर १०० स्फ्फुटपदे, उपदेश प्रकरणात शिष्यबोध व छात्रबोध हे दोन ग्रंथ आहेत. याव्यतिरीक्त अमृतानुभव, शांडिल्य सुत्र, नारद भक्तीसुत्र, भक्ती रसायन, चांगदेव पासष्टी, ईशावास्य, विष्णु सहस्रनाम बोधिनी, गौडपाद कारिका विवरण, विचारसागर प्रदिप यासारखे टिकाग्रंथ व १२५ बोधकथाही लिहील्या आहेत.

गणेश दत्तात्रेय सहस्रबुद्धे ऊर्फ्फ दासगणू महाराज हे मराठी संत, कवी, ग्रंथकार व कीर्तनकार होते. त्यांनी मोठ्या प्रमाणात केलेल्या संत चरित्रलेखनामुळे त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे महीपती म्हणून ओळखतात. त्यांचा जन्म पौष शु.११ शके १७८९ म्हणजेच दि.६ जानेवारी १८६८ रोजी अकोळनेर, ता.जि.अहमदनगर या गावी झाला. त्यांचा विवाह जामखेड तालुक्यात बोरले आष्टी येथील जहांगिरदार नारायण रानडे यांची कन्या सरस्वती यांच्याशी सन १८९२मध्ये झाला. सन १८९३मध्ये ते पोलीस खात्यात भरती झाले आणि सन १९०४पर्यंत ती नोकरी केली. ते पोलीसखात्यात नोकरीला असले तरी त्यांच्या ओढा मात्र परमार्थाकडेच होता. या दरम्यानच त्यांच्यावर त्या काळचा कुख्यात गुंड कान्हा भिल्ल याला पकडण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. जेव्हा त्या गुंडाला ही बातमी कळाली, तेव्हा त्याने महाराजांना जीवे मारण्याचे ठरविले. पण महाराज यातून सहीसलामत सुटले. तेव्हापासून त्यांची अशी धारणा झाली की ईश्वरानेच आपल्याला वाचविले. मग त्यांनी संपूर्ण जीवन ईश्वरचरणी अर्पण करण्याचे ठरविले. त्यांचे पहिले कीर्तन इ.स.१८९७ साली जामखेडच्या श्रीविठ्ठल मंदिरात झाले. त्यांनी 'श्री साईनाथ स्तवनमंजिरी' या स्तोत्राची निर्मिती दि.९ सप्टेंबर १९१८ रोजी मध्य प्रदेशातील श्री माहेश्वर या क्षेत्री साईबाबांचे महानिर्वाणाअगोदर ३७ दिवसांपूर्वी केली. साईबाबा संस्थानची स्थापना सन १९२२साली झाली आणि पहिले अध्यक्ष म्हणून दासगणू महारांजाची निवड केली गेली. तेथून पुढे सन १९४५पर्यंत त्यांनी अध्यक्षपद सांभाळले. श्री दासगणू महाराजांनी ईशावास्य उपनिषद भाषांतराचे कार्य सुरु केले आणि ते अडले या पहिल्याच श्लोकापाशी-

'ईशावास्यमिदं सर्वं यत्किंचीत जगत्यां जगत।
**तेन त्यक्तेन भुञ्जिथा मा गृध: कस्यस्विद्नम।।'**

अर्थात- या चराचरात जे म्हणून काही आहे, म्हटल्याने दिसते, भासते, जाणवते ते सारे ईश्वराने व्यापलेले आहे. त्या सर्वाचा त्यागपूर्वक भोग घ्यावा. दुसरी कोणतीही अपेक्षा ठेवू नये. महाराज त्यागपूर्वक भोग घ्यावा, या शब्दांपाशी अडले. त्यागाने भोग तरी कसे शक्य आहे? असे त्यांना वाटले. भल्या भल्या विद्वानांशी चर्चा करूनही अर्थ उकलेना. शेवटी त्यांनी शिर्डी गाठली आणि श्री साईबाबांनाच प्रार्थना करून त्या श्लोकाचा अर्थ विचारला. त्यावर बाबा हसून म्हणाले, 'अरे हा अर्थ तर तुला काका दीक्षितच्या घरची मोलकरीण सांगेल!' श्री दासगणूनाच नव्हे तर हे उत्तर ऐकणाऱ्या सर्वांनाच आश्चर्य वाटले. त्या बिचारीचे शिक्षण ते किती? बुद्धी ती काय? ती उपनिषदांची अर्थ-व्युत्पत्ती कशी काय करणार?

मग दासगणू महाराज काकासाहेबांच्या घरी गेले. रात्री श्री साईबाबांविषयी गप्पा झाल्या. त्या स्मरण रंजणातच ते झोपी गेले. ते दिवाळीचे दिवस होते. पहाटेच त्यांना जाग आली ती कुणाच्या तरी मधुर गुणगुणण्याने! आधीच दिवाळीची प्रसन्न पहाट त्यात हा सुश्राव्य स्वर!! दासगणू महाराज जाऊन बघतात, तो काय? भांडी घासण्यात दंग असलेली काकांची मोलकरीण गाणे गुणगुणत होती. ती पोर अंगावर फ्फ़ाटके लुगडे नेसली होती आणि गात होती, नारिंगी रंगाच्या साडीची महती सांगणारे ते गाणे! त्या साडीची भरजरी नक्षी, तिचे काठ, तीचा पदर यांचे भरभरून वर्णन त्यात होते. दिवाळीच्या आनंदात माखलेल्या काकांच्या घरातल्या पोरीबाळी नव्या कपड्यात नटल्या होत्या. त्यांना पाहून फ्फ़ाटक्या कपड्यातली ती पोर उदासपणे नारिंगी साडीचे गोडवे गाणारे ते गाणे गुणगुणत होती. महाराजांचे मन या दृष्याने हेलावले. ते काकांना म्हणाले, ' अहो काका, या पोरीला सुद्धा एखादी नवी साडी घेऊन द्या. काकासुद्धा मुळात उदार ह्रदयाचे त्यात महाराजांची विनंती! तेव्हा आनंदाने ते घरांत गेले. दिवाळीच्या खरेदी निमित्त कपाटात आणखीही काही नव्या साड्या होत्या. त्यातली एक सुंदरशी साडी त्यांनी या पोरीला भेट म्हणून दिली. नवी साडी नेसून संध्याकाळी मैत्रिणींसोबत ती पोर फ्फ़िरली आणि बागडली देखील. दुसऱ्या दिवशी ती आली मात्र जुनी साडी नेसूनच. नवी साडी घरी ठेवून. पण चेहऱ्यावर कालची उदासीनता नावालाही नव्हती. उलट आनंद विलसत होता. काल अंगावर जुनी साडी आणि चेहऱ्यावर उदासीनता होती. आजही अंगावर जुनीच साडी, मात्र चेहऱ्यावर आनंद! तिचं हे रूप पाहताच दासगणू महाराजांच्या हृदयांतरी श्लोक निनादला-

'ईशावास्यमिदं सर्वं यत्किंचीत जगत्यां जगत।
तेन त्यक्तेन भुञ्जिथा मा गृध: कस्यस्विद्नम।।'

या मोलकरणीच्या निमित्ताने महाराजांना त्यागपूर्वक भोगचा अर्थ उमगला. आज ती नवी साडी नेसली नव्हती तरी कालचे दैन्य ओसरले होते. ते केवळ भावना बदलल्याने! आज मनाने ती खिन्न नव्हती कारण साडीची उणीव नव्हती. प्रथम नवे लुगडे घ्यायला असमर्थ होती, म्हणून नाईलाजाने जुनेच लुगडे नेसून उदास होती. मग नवे लुगडे मिळाले, ते नेसण्यास समर्थ होती. तरीही जुनेच नेसायचे तिने मनाशी ठरवले, त्यामुळे ती मनाने उदास नव्हती. समर्थ असूनही दैन्य मिरवीत होती. केवळ नाही नाही, आणि आहे नाही, या भावनांच्या गुणांनेच माणूस सुख आणि दु:ख भोगतो. प्रत्यक्षात सुख आणि दु:खाचे मोजमाप बाह्यांगावरून करता येत नाही. सर्व जर काही एकाच ईश्वराने व्यापले आहे, तर त्यात सुख आणि दु:ख आले कोठून? नवी साडी नसल्याची अपूर्णता दु:खाचे कारण होती. साडी लाभल्याची पूर्णता हे सुखाचे कारण बनले. फ्फ़रक बाह्यात पडला नाही, आंतरिक होता. थोडक्यात सुख आणि दु:ख हे आंतरिक आहे. प्रत्यक्षात सारे काही पूर्णच आहे. फ्फ़ाटकी साडी नेसलेली ती पोर ईश्वराचेच अंश होते. दाता म्हणजे काका आणि त्यांनी दिलेले दानही ईश्वरी अंशच. मग सारे काही अशेषच!

ईश्वरावाचून वेगळे काहीच नाही. केवळ मीपणाने आंतरिक सुख-दु:ख आहे. मीपणामुळे मी देणारा, मी घेणारा, मी अभावग्रस्त असा भाव आहे. प्रत्यक्षात दाता, देय, दान सारे काही ईश्वरी सत्तेतच सामावलेले आहे. अशा राज्य महीपती दासगणू महाराजांचे महानिर्वाण श्रीज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथीला- कार्तिक वद्य १३ शके १८८३ म्हणजेच दि.२६ नोव्हेंबर १९६२ रोजी पंढरपुरात झाले.

!! दासगणू महाराजांच्या जयंती सप्ताह निमित्ताने त्यांना विनम्र अभिवादन !!

-: संत चरणरज :-
बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.
द्वारा- प. पू. गुरूदेव हरदेव कृपानिवास.
मु. एकता चौक, रामनगर वॉर्ड नं.२०,
गडचिरोली.
जि. गडचिरोली, संपर्क- ७७७५०४१०८६.

# सिद्धार्थ प्राणी संग्रहालयातील सर्व प्राणी निरोगी व तंदुरुस्त

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नागपूर येथील गोरेवाडा वन्यजीव बचाव केंद्रात एन-५ एन-१ एव्हियन इन्फ्लुएन्झा विषाणूमुळे तीन वाघासंह एक बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या पार्श्वभूमीवर मां.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार छत्रपती संभाजीनगर महापालिकेने खबरदारीचा उपाय म्हणून सिद्धार्थ उद्यान प्राणिसंग्रहालयातील वाघांसह विविध प्राण्यांची तपासणी केली.




वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्राने महाराष्ट्रातील प्राणिसंग्रहालये आणि वन्यजीव बचाव केंद्राना राज्यव्यापी सूचना जारी केल्या होत्या. दि.०९ जानेवारी रोजी सिध्दार्थ उद्यान प्राणी संगहालयातील सर्व प्राण्यांची पाहणी व तपासणी डॉ. असरार अहेमद, सहाय्यक आयुक्त, (पशुसंवर्धन) प्रादेशिक रोग अन्वेषण, प्रयोगशाळा, खडकेश्वर आणि डॉ. विजया कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त, (पशुसंवर्धन) पशुसर्वचिकीत्सालय, खडकेश्वर, तसेच डॉ. नंदा गायकवाड, पशुधन विकास अधिकारी, डॉ.एम.एल. पवार पशुधन विकास अधिकारी, पशुसर्वचिकीत्सालय, खडकेश्वर, छत्रपती संभाजीनगर यांनी केली.

पाहणीच्या वेळी त्यांनी प्राणीसंग्रहालयात असलेल्या वाघ, बिबट आणि पक्षी घराची पाहणी केली. यावेळी सर्व प्राणी तंदुरुस्त आणि निरोगी असल्याचे दिसुन आले. तरीसुध्दा खबरदारीचा उपाय म्हणुन एव्हीएन एन्फ्लुन्झा या विषाणु पासुन आजाराचे संरक्षण होण्याकरिता देण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश प्राणीसंग्रहालय कर्मचारी यांना दिले.

तसेच मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांनी प्राणी संग्रहालयातील सर्व कर्मचाऱ्यांना प्राण्यांची योग्य ती निगा, काळजी घेण्याचे व प्राण्यांचे पिंजरे आणि नियमीत साफ्फ़सफ्फ़ाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्राणी संग्रहालयातील प्राण्यांची निगा राखण्यात येत आहे व त्यांचे पिंजरे व परिसरात औषधी फ्फ़वारणी करून स्वच्छता करण्यात आली आहे. अशी माहिती उप आयुक्त ०५ तथा उद्यान अधिक्षक विजय पाटील यांनी दिली आहे.

पान २ वरून

# नैसर्गिक आपत्तीग्रस्त ५.३० लाख शेतकऱ्यांना ५३५ कोटी रुपयांची पीक नुकसान भरपाई - मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील

या मदतीमध्ये अमरावती विभागात अमरावती जिल्ह्यातील १० हजार १३५ शेतकऱ्यांना १६ कोटी ११ लाख ८१ हजार ४५८ रुपये, बुलढाणा जिल्ह्यातील ६ हजार २६४ शेतकऱ्यांना ६ कोटी ९५ लाख ५६ हजार ६२० रुपये, अकोला जिल्ह्यातील ५ हजार ५५७ शेतकऱ्यांना ६ कोटी १७ लाख ६३ हजार ३८९ रुपये, यवतमाळ जिल्ह्यातील ५ हजार १७१ शेतकऱ्यांना ४ कोटी २६ लाख ७८ हजार ६ रुपये, वाशिम जिल्ह्यातील १ हजार ७९२ शेतकऱ्यांना १ कोटी ८५ लाख ७ हजार १७३ रुपये.

छत्रपती संभाजीनगर विभागात लातूर जिल्ह्यातील १ लाख ६८ हजार ८९ शेतकऱ्यांना १७८ कोटी ६५ लाख ६४ हजार १२५ रुपये, परभणी जिल्ह्यातील १ लाख १२ हजार ६४८ शेतकऱ्यांना १२१ कोटी ६४ लाख ५६३ रुपये, बीड जिल्ह्यातील ३९ हजार ९३ शेतकऱ्यांना ३० कोटी २२ लाख ६९ हजार ९०३ रुपये, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३ हजार ६१९ शेतकऱ्यांना ३ कोटी २३ लाख ६७ हजार ८६२ रुपये, हिंगोली जिल्ह्यातील २ हजार ४०८ शेतकऱ्यांना १ कोटी ६३ लाख ५३ हजार ३३३ रुपये, नांदेड जिल्ह्यातील १ हजार ८८६ शेतकऱ्यांना १ कोटी ५८ लाख ७० हजार ७११ रुपये, जालना जिल्ह्यातील १ हजार ५९० शेतकऱ्यांना १ कोटी ५७ लाख ९० हजार ७३७ रुपये, धाराशिव जिल्ह्यातील ३४२ शेतकऱ्यांना ३२ लाख ५० हजार १४८ रुपये.

कोकण विभागात पालघर जिल्ह्यातील १ हजार ७४२ शेतकऱ्यांना १ कोटी २२ हजार ९९९ रुपये, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ९२० शेतकऱ्यांना २३ लाख ४७ हजार ६६७ रुपये, ठाणे जिल्ह्यातील १२७ शेतकऱ्यांना १२ लाख ४८ हजार ९९० रुपये, रायगड जिल्ह्यातील १६१ शेतकऱ्यांना १० लाख ६७ हजार ८६ रुपये, रत्नागिरी जिल्ह्यातील ७१ शेतकऱ्यांना १ लाख ७२ हजार ५१६ रुपये.

नागपूर विभागात चंद्रपूर जिल्ह्यातील ४५ हजार ९२४ शेतकऱ्यांना ४१ कोटी ८७ लाख ३८ हजार ७१ रुपये, गडचिरोली जिल्ह्यातील १८ हजार ९८८ शेतकऱ्यांना १९ कोटी १६ लाख २१९ रुपये, भंडारा जिल्ह्यातील १९ हजार ३७ शेतकऱ्यांना १९ कोटी १४ लाख ३३ हजार ५७५ रुपये, वर्धा जिल्ह्यातील १६ हजार २८४ शेतकऱ्यांना १६ कोटी ३९ लाख ३३ हजार १५९ रुपये, गोंदिया जिल्ह्यातील ५ हजार ९९५ शेतकऱ्यांना ६ कोटी २६ लाख ११ हजार १७८ रुपये, नागपूर जिल्ह्यातील २ हजार १५८ शेतकऱ्यांना २ कोटी ९६ लाख ४० हजार ९९५ रुपये.

नाशिक विभागात जळगाव जिल्ह्यातील ४ हजार २७४ शेतकऱ्यांना ५ कोटी ६५ लाख ५५ हजार ७३५ रुपये, नाशिक जिल्ह्यातील ५ हजार ४२ शेतकऱ्यांना ४ कोटी ४३ लाख ९८ हजार ६४२ रुपये, अहिल्यानगर जिल्ह्यातील २ हजार ९७५ शेतकऱ्यांना २ कोटी ५४ लाख ६५ हजार ९७० रुपये, धुळे जिल्ह्यातील ४८३ शेतकऱ्यांना ४६ लाख ८३ हजार ५५१ रुपये, नंदुरबार जिल्ह्यातील १७ शेतकऱ्यांना २ लाख ७८ हजार ४६५ रुपये.

पुणे विभागातील कोल्हापूर जिल्ह्यातील ४३ हजार ३२१ शेतकऱ्यांना ३५ कोटी ८७ लाख १६ हजार ९४ रुपये, सोलापूर जिल्ह्यातील ३ हजार १३ शेतकऱ्यांना ४ कोटी २५ लाख ४ हजार २८७ रुपये, सांगली जिल्ह्यातील ५२२ शेतकऱ्यांना ५२ लाख १२ हजार ८०३ रुपये, पुणे जिल्ह्यातील ३९० शेतकऱ्यांना ३२ लाख ७४ हजार ४८९ रुपये आणि सातारा जिल्ह्यातील २७ शेतकऱ्यांना १ लाख १४ हजार ३७६ रुपये मदतीचा यामध्ये समावेश आहे.

# जात वैधता सादर करण्यास तात्काळ मुदतवाढ द्या

**मुंबई**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नियमीत पडताळणी समिती स्थापना करून एस ई बी सी आणि ओबीसी जात पडताळणी साठी नव्याने किमान तीन महिन्याची मुदत वाढ द्यावी अशी मागणी सातत्याने मुख्यमंत्र्याकडे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे.

या सुद्धा पुर्वी ५ सप्टेंबर २०२४ रोजी शासनाचा आदेशान्वये मिळाली होती एसईबीसी ओबीसी कुणबी जात प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रम शिक्षणाचा लाभ घेताना एसईबीसी, कुणबी व ओबीसी जात प्रमाणपत्र पडताळणी- व्हॅलिडीटी बाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय २२ जुलै २०२४ च्या निर्णयाचा संदर्भ जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी दिला होता व विनंती केली होती की, सध्या शैक्षणिक प्रवेश सुरु असून कुणबी व विविध जात प्रवर्गाचे प्रवेशात जातवैधता प्रमाणपत्र बंधनकारक आहे.एस ई बी सी ओबीसी कुणबी जात प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्र शिक्षणाचा लाभ घेताना एस ई बी सी विद्यार्थी प्रमाणे कुणबी व ओबीसी जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी व व्हॅलिडीटी बाबत सहा महिने मुदत वाढ मिळण्याचे आदेश होणे अत्यंत गरजेचे असुन सदर अडचणी सोडवण्यासाठी अती तात्काळ एमएच- सीईटी व इतर प्रवेश सेल यांना तातडीने आदेश होणे सुद्धा गरजेचे असल्याचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्र्यांकडे दिलेल्या निवेदनात नमुद केले होते त्या वेळेस सुद्धा हीच मागणी मंजुर झाली होती. दरम्यान अनेक उमेदवारांना या कालावधीमध्ये संबंधित उमेदवाराने जात वैधता प्रमाण पत्र सादर करणे बंधनकारक होते अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द होतील व त्याबाबत संबंधित उमेदवार स्वतः जबाबदार राहतील असे शासनाने नमुद केले होते.



**- अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांची मागणी**

**जात वैधता पडताळणी समितीची स्थिती गंभीर त्यावर सुद्धा निर्णय होणे गरजेचे**

महाराष्ट्र राज्यात जात वैधता पडताळणी समित्या बाबत विचार करता एकुण ३६ पैकी १४ ठिकाणी अध्यक्ष असुन उर्वरित ठिकाणी प्रभारी अध्यक्ष आहेत.याचा परीणाम शासकीय यंत्रणेवर होत आहे आणि परिणामतः जातवैधता प्रमाण पत्रे विहीत वेळेत उपलब्ध होत नाही त्या मुळे राज्य भारातील सध्याच्या प्रवेश प्रक्रियेत एसईबीसीप्रमाणेच ओबीसी (कुणबी) व इतर विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाण पत्रासाठी अर्ज केलेल्या पोहोच पावती फक्त प्रवेशाच्या अंतिम तारखे पर्यंतच मान्यता गृहीत धरण्यात येते परंतु अंतिम दिनांक पर्यंत म्हणजे कट ऑफ डेट रोजी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास प्रवेश आपोआप रद्द होतो यामुळे असंख्य विद्यार्थी आरक्षण व सवलती च्या लाभापासून वंचित राहत असुन या वर गांभीर्याने निर्णय होणे गरजेचे असल्याचेही जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केले होते. सद्य स्थितीत गांभीर्य पहाता एसईबीसी- ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांची मुदतवाढ अल्पशी ठरत असुन सदरच्या कालावधीत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांपैकी अनेक उमेदवार विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकले नाहीत सदर जात वैधता प्रमाणपत्र सादर करू न शकलेल्या उमेदवारांचे शैक्षणिक हित लक्षात घेता शासनाने तात्काळ किमान तीन महिन्याची मुदतवाढ द्यावी त्यात २०२४-२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमां सहित) एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहे परंतु विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकलेले नाहीत.

अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्या साठी अधिकची नव्याने किमान तीन महिन्याची मुदत वाढ द्यावी अशी मागणही पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव आणि जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी लेखी निवेदना द्वारे मुख्यमंत्री यांचे कडे केली आहे.

## ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे वखारीत चर्चासत्र संपन्न सीताफळ हे मोसंबीला उत्तम पर्यायी फळपीक - डॉ. श्रीकृष्ण सोनुने



**जालना (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जालना जिल्हा मोसंबी फळपिकाचे हब असले तरी ते मोसंबी सध्या अनंत अडचणीत सापडली असून मोसंबीला सीताफळ हे उत्तम पर्यायी फफ़ळपीक ठरत असल्याचे प्रतिपादन वरिष्ठ शास्त्रज्ञ व खरपूडीच्या कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. श्रीकृष्ण सोनुने यांनी केले. जालना जिल्ह्यातील ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला आयोजिण्यात येणारे जानेवारी महिन्यातील नियमित मासिक चर्चासत्र गुरुवार (दि. ९ जाने.) रोजी जालना तालुक्यातील मौजे वखारी (वडगांव) येथे पार पडले. त्याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. श्रीकृष्ण सोनुने बोलत होते.

शेतीमध्ये मेहनतीपेक्षा ज्ञानाला जास्त म हत्व असून शेतकऱ्यांना आता स्मार्ट शेतीकडे वळावे लागेल. विचाराची देवाण घेवाण करण्यासाठी शेतकऱ्यांनी तज्ज्ञ शेतकरी, शास्त्रज्ञब यांच्या संपर्कात राहून शेतीविकास घडवण्याची गरज असल्याचेही डॉ. सोनुने म्हणाले. फळातील फळमाशीचे व्यवस्थापनही डॉ. सोनुने यांनी समजावून सांगितले. टाकळी माळी येथील मधुमक्षिकापालक श्री. गणेश विनायक बुरकूल यांनी यावेळी मधुमक्षिका पालणा संदर्भात सविस्तर माहिती सांगितली.

गटशेतीच्या माध्यमातून पीकविलेल्या दर्जेदार मालाचा ब्रँड करून आपल्याला आपल्या मालाची किंमत ठरवून पाहिजे तो भाव पदरात पाडून घेता येतो असे ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी आपल्या अनुभवातून सोदाहरण सांगितले. दहिगावचे श्री. नंदकिशोर देशमुख, अकोला देवचे श्री. दत्तात्रय सवडे यांनीही गटशेतीतील आपले अनुभव सांगितले.

सुरुवातीला आयोजक श्री. रामप्रसाद खैरे यांच्या सोळा एक्कर आदर्श सीताफळ बागेत शिवारफेरी करण्यात आली. मातृवंदनेने कार्यक्रमाची सुरुवात होऊन वन भोजनाने सांगता झाली.

रामप्रताप खैरे यांनी प्रास्ताविक करून आभार मानले. कार्यक्रमाला नळविहिरा येथील मा. चेअरमन श्री. विष्णू पा. गाडेकर, अकोला देवचे श्री. देविदास सवडे , चिखली येथील श्री. नारायण जावळे, मलगी येथील श्री. विठोबा पवार, कडवंचीचे श्री. मोरेश्वर क्षीरसागर, श्री. श्रीनिवास क्षीरसागर, श्री. ऋषिकेश क्षीरसागर, देऊळगाव राजाचे म. जावेद, शेख समीर, वखारीचे श्री. डिगांबर खैरे, श्री. सतीश खैरे, श्री. निवृत्ती घुले, श्री. बळीराम घुले, श्री. गणेश घुले, श्री. गजानन घुले, यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

# लातूर शहरात भारतीय जनता पक्षाकडून विकास कामाच्या भूमिपूजनाचा फार्स

## योजना कुठली? मंजूर केली कोण? वर्क ऑर्डर आहे का? भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करतय कोण?

**लातूर/अमरजीत बनसोडे**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**



लातूर शहरात , विकास योजना भूमिपूजनाचा भारतीय जनता पक्षाकडून फार्स करण्यात येत आहे, योजना कोणती? वर्क ऑर्डर निघाली आहे का ? यासंबंधी कोणतीच माहिती न देता आणि विशेष म्हणजे महानगरपालिकेत माहिती नसताना भूमिपूजन कार्यक्रम ठेवण्यात येत आहे, यासाठी संदर्भात आज काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने महापालिकेत जाऊन उपायुक्त श्री खानसोळे यांच्याकडे विचारणा केली, मात्र त्यांनाही यासंदर्भात कोणती माहिती देता आली नाही,

या संदर्भातील माहिती अधिक माहिती अशी की,भारतीय जनता पक्षाच्या वतीने लातूर शहरात प्रभाग १४ मध्ये विकास कामाचे भूमिपूजन अशा आशयाच्या पोस्ट प्रसिद्ध झाल्या आहेत. प्रभाग १४ मधील ज्या विकास योजनेचे भूमिपूजन केले जाणार आहे त्याची महानगरपालिकेला काही कल्पना आहे का? यासंबंधी आज काँग्रेसच्या शिष्टमंडळाने महापालिकेत जाऊन आयुक्तांकडे विचारणा केली,

कोणत्या कामाची भूमिपूजन ? कोणी मंजूर केले? कोणत्या योजनेतून काम होत आहे? वर्क ऑर्डर आहे का? यासंबंधी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष ॲड. किरण जाधव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने विचारणा केली असता, उपायुक्त श्री खांसुळे यासंबंधी काही उत्तर देऊ शकले नाहीत, महानगरपालिकेला माहिती नसताना असे एखाद्या राजकीय पक्षाला भूमिपूजन करता येते का? याचेही समर्पक उत्तर त्यांना देता आले नाही, लातूर शहरात, नेमके काय चालू आहे याचा ताळमेळ प्रशासकीय पातळीवर दिसून येत नाही, निधी कोण आणला? कोणत्या योजनेतून आणला?

कोणती एजन्सी काम करणार आहे , याचा कुठलाही ताळमेळ नसताना भारतीय जनता पक्ष भूमिपूजनाचा घाट का घातला जातो आहे, याचे उत्तर महानगरपालिकेत कोणीही देऊ शकलेले नाही, शासन आणि प्रशासन यांच्यात कोणताच ताळमेळ नसल्याचे दिसून येत आहे. जर प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप करत अशा अनधिकृत भूमिपूजन सोहळ्याला पायबंद घातला नाही तर सभापती कडे तक्रार करण्यात येईल असे शिष्टमंडळाने महापालिकेला कळवले.

काँग्रेस पक्षाच्या या शिष्टमंडळात, माजी महापौर, सौ स्मिता खानापुरे दीपक सूळ, स्थायी समितीचे माजी माजी सभापती अशोक गोविंद गोविंदपुरकर, गोरोबा लोखंडे,युवक काँग्रेस अध्यक्ष इमरान सय्यद, अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष प्रा. प्रवीण कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, आयुब म णियार, दत्ता सोमवंशी, आसिफ़्फ़ बागवान, सिकंदर पटेल,बागवान, राजू गवळी, ॲड. गणेश कांबळे, नितीन कांबळे, काशिनाथ वाघमारे, यांच्यासह काँग्रेस पक्षाचे असंख्य पदाधिकारी आंदोलनात सहभागी झाले होते.

# जैन टॅगच्या प्रदर्शनी उद्घाटन संपन्न

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**



महिला सक्षमीक रण क रण्यासाठी जैन टॅग या महिला ग्रुप तर्फे आज या प्रदर्शनीचे उदघाटन अग्रेसन भवन सिडको येथे आशु दर्डा, आल्पा जैन, पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, मिस्टर फफ़ुड राईटचे संचालक संदिपसिंग सी.ए. रफ्पाली बोथरा, म निषा भंसाली, पंचायतचे माजी अध्यक्ष ललीत पाटणी, विश्वस्थ महावीर ठोले यांच्या हस्ते क रण्यात आले.

यावेळी क ार्यक माचे सुत्रसंचालन रिना ठोले यांनी के ले. तर स्वागत गित कि र्ती पाटणी यांनी गायले. क ार्यक माचे प्रोजेक्ट चेअरमेन जैन टॅग अध्यक्षा श्श्वेता क ासलीवाल, जयश्री लोहाडे, पुर्वा क ासलीवाल व श्वेता गंगवाल हया होत्या.

या प्रदर्शनीमध्ये महिलांनी घरफ्न बनुन आलेल्या पदार्थाचे प्रदर्शन लावले होते. जैन टॅग व्दारा नेहमी सामाजिक व जनक ल्याणक ारी योजना राबविल्या जातात. त्याच अंतर्गत महिलांनी घरी बनविलेल्या वस्तुला चालना मिळावी प्रसिध्दी मिळावी या हेतुने हे प्रदर्शन लावण्यात आले होते. या प्रदर्शनासाठी सर्व स्तरातील समाज बांधवांना मोफत प्रवेश ठेवण्यात आला होता.

या प्रदर्शनामध्ये ७० महिलांनी आपला सहभाग नोदविला होता. या प्रदर्शनीमध्ये नवजीवन मतीमंद मुला मुर्लीनी बनविलेल्या सस्तुचे सुध्दा प्रदर्शन यावेळी लावण्यात आले होते. यावेही आशु दर्डा यांनी सांगीतले क ी, जैन टॅग या ग्रुपचे क ार्य अत्यंत प्रशंसनीय आहे. व नेहमी सामाजिक व जनक ल्याणारी योजना राबवतात. या बददल त्यांचे क ौतुक क रफ्न अभिनंदन के ले.

यावेळी शर्मिला गांधी प्रमोद पाटणी, ॲड . अनिल क ासलीवाल, पदम गंगवाल, समिर ठोले, अनुज दगडा, राहुल पांडे, राजेश क ासलीवाल, शैलेश पहाडे, सचिन लोहाडे यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती.

क ार्यक्रम यशस्वी क रण्यासाठी जैन टॅगच्या अध्यक्षा श्श्वेता क ासलीवाल, उपाध्यक्ष पुर्वा कासलीवाल, सचिव जयश्री लोहाडे, क ोषाध्यक्ष श्श्वेता गंगवाल, जैन टॅगच्या संरक्षिका अनुपमा दगडा, दिपीका बडजाते यांच्यासह रिचा क ासलीवाल, याशिका पांडे, स्वाती क ासलीवाल, छाया क ासलीवाल, रचना पहाडे, नेत्र्जा क ासलीवाल, मिताली क ाला, राणु सेठी, सिमा बडजाते, सारिका बडजाते, किर्ती पाटणी, उज्वला पाटणी, सपना पाटणी, पुजा झांजरी आर्दीनी परिश्रम घेतले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष क ासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

## वैकुंठ एकाशीनिमित्त अमरावतीत बालाजी मंदिरात भक्तांची अलोट गर्दी!

अमरावती : अम रावती शहरातील प्रसिद्ध बालाजी मंदिरात आज वैकुंठ एकादशीनिमित्त (तरळर्झीपींहर एज्ञरवरीहळ) बालाजी मंदिराचे वैकुंठद्वार उघडण्यात आले. या द्वारातून भगवान बालाजींचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी उसळली. वर्षातून एकदाच हे द्वार उघडले जाते. त्यामुळे सकाळी ६ वाजेपासून भाविकांनी बालाजींचे दर्शन घेतले. वैकुंठ एकादशीनिमित्त पालखी काढण्यात आली. मंदिरावर सुरेख विद्युत रोषणाई करण्यात आली. भाविकांना प्रसादाचे वितरण हि करण्यात आले. आज सकाळी भगवान बालाजीं चे विधिवत पूजा अर्चना केल्यानंतर पालखी काढण्यात आली त्यानंतर मंदिराचे वैकुंठद्वार उघडण्यात आले. यावेळी जय गोविंदा, व्यंकटरमना गोविंदा च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.



# लातूरला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याच्या मागणीसाठी, विद्यापीठ निर्माण कृती समिती पुन्हा आक्रमक

**लातूर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

लातूर जिल्ह्यातील ‘आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृति समिति लातूरच्या वतिने लातूरला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचीं मागणी अनेक वर्षापासून लावून धरलेली आहे.

लातूरकराच्या मागणीतून लोकनेते स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्या प्रयत्नातून २००७ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड उपकेंद्र पेठ लातुर येथे सुरु करण्यात आलेले आहे लातुर जिल्हयातर्गत कला, वाणिज्य, विज्ञान ,, विधी, अभियांत्रिकी, वैद्यकीय अनुदानित ३६ महाविद्यालय,कायम विनाअनुदानित ८० असे एकूण ११६ महाविद्यालय आहेत व त्यामध्ये एकूण विद्यार्थी संख्या ५५,४१०आहे ,या प्रशासकीय शैक्षणिक कामाचे स्वरूप लक्षात घेता महाविद्यालयीन प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, पालकांना नांदेडला पायपीठ करावी लागते आहे तर शेजारच्या सोलापूर जिल्हयासाठी महाविद्यालयांची संख्या १०९असताना विद्यार्थी, पालक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सोईसाठी २०१४ मध्ये स्वतंत्र विद्यापीठ शासनाने दिलेले आहे. लातुर जिल्हाची शिक्षणातील भरारी पाहता लातूर पॅटर्न राज्यात व देशात सर्वदूर परिचीत आहे. आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्या वतीने लातूरला स्वतंत्र विद्यापीठाची मागणी शासन दरबारी वेळोवेळी लावून धरलेली आहे, विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला प्रोत्साहन मिळावे यासाठी लातुरला स्वतंत्र विद्यापीठाची मागणी सातत्याने करीत आहेत.

राज्याचे माजी मंत्री वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा माजी पालकमंत्री आ अमित विलासराव देशमुख, राष्ट्रवादीचे नेते तथा माजी मंत्री आ संजय बनसोडे यांनी ही उपकेंद्राच्या शैक्षणिक कामकाजात ठराविक मर्यादा असल्यामुळे स्थानिक पातळीवर निर्माण होणारी शैक्षणिक व प्रशासकीय गैरसोय टाळण्यासाठी लातुर येथे स्वतंत्र विद्यापीठ करणे बाबत सहानुभूती पूर्वक विचार व्हावा अशा आशयाचे पत्र तत्कालीन मुख्यमंत्री मा ना उद्धव ठाकरे , मा ना उदय सामंत ,उच्च व तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य यांना दिलेले आहे तर आ सभाजी पाटील निलंगेकर, आ अभिमन्यू भैय्या पवार यांनी ही हिवाळी अधिवेशन काळात विद्यापीठाची मागणी लावून धरली आहे.

मा सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग नांदेड व कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांचे शिफ़ारस अहवालावरून लातुर येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्या बाबत विद्यापीठ कायदा २०१६ अंतर्गत कलम ३(२)नुसार शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही होणे गरजेचे असल्याचा अहवाल श्री डॉ धनराज माने, शिक्षण संचालक,उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य यांनी दि.१५.९.२०२० च्या पत्रांनव्ये अप्पर मुख्य सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना अहवाल सादर केलेला आहे,त्यामुळे निकषांवर लातूरला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन होने गरजेचे व अत्याआवश्यक आहे.याबाबत राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्रीना देवेंद्र फ़ड़णवीस,उपमुख्यमंत्री ना अजित दादा पवार यांना ही दि.४ मार्च २०२२ रोजी प्रत्यक्ष भेटुन निवेदनाद्वारे अवगतकरून दिलेले आहे. राज्याचे तत्कालीन राज्यपाल सी विद्यासागर, भगतसिंह कोशहयारी, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री उदय सामंत, श्री चंद्रकांत दादा पाटील, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव रस्तोगी आदीना भेटून निवेदन देण्यात आले आहे, वेळोवेळी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्वाक्षरी मोहीम,धरणे आंदोलन, निदर्शने, उपोषण आंदोलन, तत्कालीन मुख्यमंत्री ना श्री एकनाथ शिंदे यांना एक लाख पत्रांच्या माध्यमातुन लातूरला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

लातूर जिल्हयातील सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी नी लातूर ला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यासाठीच्या आंदोलनात सहभागी होत . लातूर जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रातील विकासाचा आलेख उंचावत ठेवण्यासाठी जिल्हयातील लोकप्रतिनिधी यांच्या भेटी घेवून स्वतंत्र विद्यापीठ मागणीस सहकार्य करण्याचे आवाहन व विनंती करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य संयोजक अँड प्रदिपसिंह गंगणे, ताहेरभाई सौदागर, बालाजीअप्पा पिंपळे, धनराज जोशी, सुनिल खडबडे, अजयसिंग राठोड, लहू जाधव, प्रा संगमेश्वर पानगावे, अँड सुहास बेंद्रे,डॉ अंबादास कारेपूरकर, दिगबर कांबळे, अतिश नवगिरे आर्दीनी दिली आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**